ePaper

# अजित पवारांना मुख्यमंत्री करा; सुप्रिया सुळेंची मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना ऑफर



| वर्ष - 6 । अंक - 156 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- भारतातील पहिले एलएनजी-फ्युएल्ड ग्रीन ट्रक्स बाजारात दाखल !
- पुणे- नाशिक रेल्वे 'स्पीड ट्रॅक'वर
- वेदांता प्रकरणात कुठल्या महाराष्ट्र द्रोह्याने शेण खाल्ले?


www.mahaenews.com | गुरुवार । दिनांक 15 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### तुकडेबंदी, ग्रामपंचायत हद्दीतील दस्त नोंदणी सुरू होणार

# दस्तनोंदणीला 'हिरवा कंदील'!

## राज्याचे महसूल मंत्री, उच्च तंत्रशिक्षण मंत्र्यांचे आदेश

**। पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्यात गुंठेवारीतील जाचक अटी दूर होईपर्यंत दस्तनोंदणी त्वरित सुरु करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा निर्धार असून, त्याबाबतचा प्रस्ताव त्वरित सादर करावा, असे आदेश महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले आहेत. राज्यभरात तुकडेबंदी व ग्राम पंचायत हद्दीतील सदनिकांची दस्तनोंदणी बंद असून त्यामुळे सर्वसामान्य सदनिकाधारक त्रस्त झाला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी भाजप प्रवक्ते संदीप खर्डेकर सातत्याने पाठपुरावा करत होते. त्यास सकारात्मक प्रतिसाद देऊन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज मंत्रालयात उच्च स्तरीय बैठकीचे आयोजन केले होते.**



सदर बैठकीला मा. ना. चंद्रकांतदादा पाटील, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, महसूल सचिव नितीन करीर,नोंदणी महानिरीक्षक श्रावण हर्डीकर यांच्यासह भाजपा प्रवक्ते संदीप खर्डेकर,शिवसेना जिल्हा प्रमुख रमेश कोंडे, माजी सभागृह नेते गणेश बिडकर, सरपंच सुभाषशेठ नाणेकर, व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष सारंग राडकर, ॲड. नितीन दसवडकर, दत्ताशेठ मारणे, सुभाष शिंदे सरकार, अभिजित कोंडे, मंगेश माळी, गुणवंत वागलगावे यांच्यासह महसूल व नोंदणी खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

> सर्वसामान्यांना कायम स्वरूपी दिलासा मिळावा यासाठी येत्या अधिवेशनात कायद्यात बदल करण्याचे मंत्री महोदयांनी सूचित केले. तसेच 2001 च्या गुंठेवारी कायद्याला मुदतवाढ देताना त्यात अनेक जाचक अटी घालण्यात आल्या व दंडाची रक्कम ही अवाच्यासवा आकरण्यात येत असल्यामुळे मनपा किंवा पी एम आर डी ए हद्दीत गुंठेवारीची अत्यल्प प्रकरणे दाखल झाली आहेत.त्यामुळे यात ही सुधारणा करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न शासन करेल.
>
> **- चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री.**




यावेळी मा. ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी सदनिकाधारकांची बाजू मांडताना महाराष्ट्र नोंदणी नियम 1961 मधील कलम 44/1 (I) याला उच्च न्यायालयाने कोणत्याही प्रकारची स्थगिती दिली नसल्याचे महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अप्पर सचिव नितीन करीर यांना त्याबाबत चा प्रस्ताव तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले असून, त्यामुळे लवकरच दस्तनोंदणी सुरु होईल असा विश्वास दोन्ही मंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे मॉस्कोमध्ये लोकार्पण

## अमित गोरखे यांची माहिती : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची उपस्थिती

**पिंपरी ।।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मॉस्कोमधील रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. या अर्धाकृती पुतळ्याचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभेचे अध्यक्ष ॲॅड. राहुल नार्वेकर, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव अमित गोरखे, हे रशिया दौऱ्यावर गेले आहेत. रशिया दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी १४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर, मॉस्को येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण केले. तर सायंकाळी मॉस्कोतील हिंदुस्थानच्या दुतावासात ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या तैलचित्राचे अनावरण करतील. हिंदुस्थान सांस्कृतिक संबंध परिषद लोमोनोसोव्ह मॉस्को युनिव्हर्सिटी, द इन्स्टिटय़ूट ऑफ ओरिएंटल स्टडीज ऑफ द रशियन अकॅडमी ऑफ सायन्स, रशियन स्टेट युनिव्हर्सिटी फॉर द ह्युमॅनिटीज,



पुश्किन रशियन लँगवेज इन्स्टिटय़ूट, सेंट पिटर्सबर्ग युनिव्हर्सिटी अशा अनेक संस्था या आयोजनात सहभागी आहेत. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, हिंदुस्थान-रशिया संबंधांची ७५ वर्षे तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे रशियातील वास्तव्य आणि त्यांच्या साहित्याचा रशियात असलेला प्रभाव, असे सर्व योग साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय काही उद्योजक आणि कंपन्यांसोबतसुद्धा महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या अनुषंगाने या दौऱ्यात भेटीगाठी होणार आहेत.

## ब्लू एनर्जी मोटर्सची ग्रीन ट्रकिंग क्रांतीच्या दिशेने वाटचाल

# भारतातील पहिले एलएनजी-फ्युएल्ड ग्रीन ट्रक्स बाजारात दाखल !

## अनिरुद्ध भुवाल्का, मेरीट मार्क्स, सिल्व्हेन ब्लेस यांची उपस्थिती

। पुणे। महाईन्यूज ।

**ब्लू एनर्जी मोटर्सने आज पुण्यातील चाकण येथील नवीन प्लान्टमध्ये लिक्विफाइड नॅचरल गॅस (एलएनजी) वर चालणा-या भारताच्या पहिल्यावहिल्या ग्रीन ट्रकचे अनावरण केले. इंधनासाठी एलएनजीचा पर्याय विकसित करण्यावर अत्यंत लक्षपूर्वक भर देत निर्माण करण्यात आलेले ब्लू एनर्जी मोटर्सचे हेवी ड्युटी आणि दीर्घ पल्ल्याच्या प्रवासासाठीचे एलएनजीवर चालणारे ट्रक्स भारतामध्ये ग्रीन ट्रकिंगची क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहेत. एलएनजीवर चालणा-या या ट्रक्सचे बाजारपेठेतील पदार्पण कंपनीच्या ५५२८*२ या पहिल्या मॉडेलच्या रूपात होणार आहे. ब्लू एनर्जी मोटर्सचे सीईओ अनिरुद्ध भुवाल्का यांच्या हस्ते Iveco ग्रुपचे सीईओ मेरीट मार्क्स व Iveco ग्रुपच्या पॉवरट्रेन बिझनेस युनिटचे प्रेसिडंट सिल्व्हेन ब्लेझ यांच्या उपस्थितीत या ट्रक्सचे अनावरण करण्यात आले.**




"आज बाजारपेठेत दाखल झालेला भारताचा पहिला एलएनजी ट्रक म्हणजे ग्रीन ट्रैकिंग क्रांतीचा पाया रचण्याच्या दृष्टीने उचललेले पहिले पाऊल आहे. ब्लू एनर्जी मोटर्समध्ये आम्ही तत्काळ उपायोजना पुरवत आणि आर्थिक परताव्याच्या अडथळ्यांना दूर करत पर्यावरण कार्बनमुक्त करण्याचे उद्दीष्ट वाळगले आहे. ते पुढे म्हणाले. या ट्रक्सची रचना केवळ पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने एक व्यवहार्य उपाययोजना म्हणूनच नव्हे तर ग्राहकांच्या व्यापारी गरजाही पूर्ण करण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. याच्या टेल पाइप एमिशनचे प्रमाण शून्य असल्याने आमचा ट्रक CO-2 चे प्रमाण बाजारपेठेत उपलब्ध इतर पारंपरिक पर्यायांच्या तुलनेत ३० टक्क्यांनी कमी करण्यास मदत करेल."

**- निरुद्ध भुवाल्का, सीईओ,** ब्लू एनर्जी मोटर्स.

"भारतीय व्यावसायिक वाहतूकीच्या क्षेत्राला प्रगत बनविण्याच्या या उत्साहकारक प्रवासाची सुरुवात करण्यासाठी FPT इंडस्ट्रियल ब्लू एनर्जी मोटर्सची साथ दिली आहे. ही गोष्ट भारावून टाकणारी आहे. भारत हे जगातील काही सर्वात मोठ्या । व्हेल मार्केट्सपैकी एक आहे आणि आमचे नव्या युगाला साजेसे तंत्रज्ञान व नैसर्गिक वायूवर चालणारे इंजिन्स देशामध्ये पर्यावरणीय परिवर्तन साकारण्याच्या प्रवासातील तसेच ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्ससाठी मूल्यनिर्मिती करणारा एक महत्वाचा घटक ठरणार आहेत.

**- सिल्व्हेन ब्लेम, प्रेसिडंट ,** पॉवरट्रेन बिझनेस, iveco ग्रुप.आयुक्त राजेंद्र डहाळे यांनी नमूद केले.

**ह**रित ऊर्जेची निर्मिती करत जवजवळ शून्य कार्बन उत्सर्जनाचे लक्ष साधत भारताच्या ट्रेकिंग उद्योगक्षेत्रामध्ये नवा प्रवाह निर्माण करण्याचे एनर्जी टर्म मध्य निर्मितीमध्ये प्रतिबिंबित झाले आहे या महिन्याच्या सुरुवातीला माननीय केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले आहे.

इटलीचे भारतामधील राजदूत हिज एक्सलन्सी व्हिन्सेन्झो हे ल्युका यांची सन्माननीय उपस्थितीही या सोहळ्याला लाभली. भारतीय दळणवळण क्षेत्रातील वाहतुकीच्या खडतर पे- यांमध्ये टिकाव धरण्याच्या दृष्टीने यू एनर्जी मोटर्स ट्रक्सची निर्मिती करण्यात येते व याच निकषांवर त्यांच्या चाचण्या घेतल्या जातात. नैसर्गिक वायूच्या क्षेत्रातील FPT इंडस्ट्रियलच्या अत्याधुनिक आणि सरम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हे ट्रक्स आपल्या श्रेणीतील सर्वोत्तम टीसीओ अर्थात खरेदीचे पुरेपूर मूल्य मिळवून देतात व त्याचबरोबर लांब पल्याच्या प्रवासामध्ये बालकांना ट्रक चालविण्याची अतुलनीय सुलभता व सुरक्षितताही पुरवितात.

ब्लू एनर्जी मोटर्सच्या ५५२८*२ ट्रकमध्ये एफपीटी इंडस्ट्रियनचे टिपॉइंट स्टॉकिजमेट्रिक कम्बशन इंजिन वापरण्यात आले आहे. जेणेकरून इंधनाचा सर्वात चांगल्या प्रकारे वापर व्हावा व डिझेल इंजिनपेक्षा कमी आवाज व्हावा. २८० एचपी पॉवर आणि १००० एनएम टॉर्क देणारा हा ट्रक भारतीय बाजारपेठेतील काही सर्वात ताली नंबर ट्रक्सपैकी एक आहे तो सीएनजी, एलएनजी आणि बायोमिथेनवरही चालू शकणारा आहे.

५५२८४*२ ट्रकमध्ये इंडस्ट्रीमधील पहिली १००० मीटर क्षमतेची इंधन टाकी बसविण्यात आली आहे. जी एकदा भरली की १४०० किमीपर्यंत अंतर पार करता येते. इतका नाव पत्ता गाठता येत असल्याने लांबच्या प्रवासाशी निगडित चिंता दूर झाल्या आहेत आणि येत्या काळात विकसित होणा-या एलएनजी डिस्पेन्सिंग नेटवर्कमुळे देशातील सर्व महत्त्वाच्या मार्गावर हे इंधन उपलब्ध होईल तसेच ते वारंवार भरण्याची गरजही भासणार नाही.

कंपनीने प्रती वर्षी १०,००० ट्रक्स बनविण्याची क्षमता असलेले निर्मितीकेंद्र उभारले असून जसजशी या ट्रक्ससाठीची परिसंस्था प्रगल्भ होत जाईल आणि मागणी वाढत जाईल तसतशी या क्षमतेमध्ये आणखी भरही घालता येईल.

# पुणे- नाशिक रेल्वे ‘स्पीड ट्रॅक’वर!

## ■ मुख्यमंत्र्यांचे निर्देश : केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना विनंती

**पुणे ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे-नाशिक अतिजलद रेल्वे मार्गामुळे विकासाला गती मिळणार असून या प्रकल्पासह 'महारेल' च्या वतीने सुरु असलेल्या राज्यातील रेल्वे प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. दरम्यान, पुणे- नाशिक अतिजलद रेल्वे मार्ग प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये मंजूर करावा, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनीवैष्णव यांच्याकडे केली आहे. महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (महारेल) च्या पुणे-नाशिक अतिजलद रेल्वे मार्गासह इतर प्रकल्पांचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या उपस्थितीत सादरीकरण करण्यात आले.**







यावेळी खासदार राहुल शेवाळे, हेमंत गोडसे, श्रीरंग बारणे, 'महारेल'चे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल, मुख्य सल्लागार सत्यप्रकाश, मुख्यमंत्री सचिवालयाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या वॉर रुमचे महासंचालक राधेश्याम मोपलवार यांचेसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पुणे-नाशिक अतिजलद रेल्वे मार्ग या २३५ कि.मी. प्रकल्पाचा लाभ पुणे, अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्याला होणार असून देशातील सर्वात किफायतशीर अतिजलद मार्ग म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाते. १६ हजार ३९ कोटी रुपये खर्चाचा हा प्रकल्प असून यात महाराष्ट्र शासनाचा ३ हजार २७३ कोटी रुपयांचा हिस्सा आहे.

या खर्चाला राज्य शासनाने तत्वतः मान्यता दिली असून सर्व आवश्यक त्या परवानग्या या प्रकल्पाला मिळाल्या आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पाला मंजुरी मिळाल्यानंतर तातडीने काम सुरु करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केल्या.

### इगतपुरी-मनमाड प्रस्तावित रेल्वे मार्ग कसाऱ्यापर्यंत वाढवा

इगतपुरी-मनमाड तिसरा, चौथा रेल्वे मार्ग कसाऱ्यापर्यंत वाढविण्याच्या दृष्टीने अभ्यास करुन तसा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी 'महारेल' ला दिल्या. तसेच इगतपुरी- मनमाड तिसरा व चौथा मार्ग (१२४ कि.मी.), सल्वा-बुटीबोरी कॉर्ड लाईन (५१ कि.मी.), औरंगाबाद-चाळीसगाव रेल्वे मार्ग (८८ कि.मी.), रोटेगाव-कोपरगाव रेल्वे मार्ग (३२ कि.मी.), गडचांदूर-मुकुटबन-आदिलाबाद रेल्वे मार्ग (७० कि.मी.) या प्रकल्पांचे प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे प्राप्त झाले आहेत, लवकरच बैठक घेऊन प्राधान्याने हे प्रकल्प मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### मुंबईत नवीन केबल स्टेड उड्डाणपूलांची उभारणी सुरु

मुंबई महानगरात रेल्वे मार्गांवर असलेल्या जुन्या उड्डाणपूलांच्या जागी नवीन केबल स्टेड उड्डाणपूल 'महारेल' कडून उभारण्यात येत आहे. या उड्डाणपूलांचे काम अधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण करण्याबरोबरच ते अधिक आकर्षक करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मुंबईत पश्चिम रेल्वे मार्गावर दादर टिळक उड्डाणपूल, बेलासिस उड्डाणपूल, मध्य रेल्वे मार्गावर रे रोड, घाटकोपर, ऑलिव्हंट, गार्डन, भायखळा, ऑर्थर रोड, करी रोड, माटुंगा लेबर कॅम्पजवळ (भुयारी मार्ग) येथे तर पश्चिम व मध्य रेल्वे मार्गावर लोअर परळ येथे हे नवीन केबल स्टेड उड्डाणपूल उभारले जात आहेत.

### पुणे-नाशिक रेल्वे प्रस्ताव कॅबिनेटमध्ये मंजुरीसाठी चर्चा

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बैठक सुरु असतानाच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला आणि 'महारेल'च्या प्रकल्पांची माहिती दिली. पुणे-नाशिक अतिजलद रेल्वे मार्ग प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत मान्यतेसाठी ठेवण्याच्या मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विनंतीवर कार्यवाही करण्यात येईल, असे रेल्वेमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले.

# महागाईविरोधात स्त्रीयांनी आवाज उठवावा!

## विद्या चव्हाण यांचे आवाहन : गौरी- गणपती सजावट स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



महागाई विरोधात स्त्रियांनी आवाज उठविला पाहिजे. सात वर्षांपूर्वी गॅस सिलिंडर, भाजीचे व इतर जीवनावश्यक वस्तूंचे भाव कमी होते आता त्यांचे भाव गगनाला भिडल्याने स्त्रियांनी भाजप विरोधात आंदोलन केले पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण यांनी केले. पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने थेरगाव परिसरात गौरी गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाला एक तोळा सोन्याचा नेकलेस, द्वितीय क्रमांकाला आठ ग्रॅम सोन्याचा नेकलेस, तृतीय क्रमांकाला पाच ग्रॅम सोन्याची अंगठी, चतुर्थ क्रमांकाला तीन ग्रॅम ठुशी, पाचव्या क्रमांकाला दीड ग्रॅमची नथ तसेच उत्तेजनार्थ ठुशी आणि स्पर्धेत भाग घेणारांसाठी प्रत्येकासाठी आकर्षक भेटवस्तूचे आयोजन करण्यात आले होते.

या गौरी गणपती स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला अध्यक्ष विद्याताई चव्हाण, वैशाली नागवडे (प्रदेश विभागीय अध्यक्ष), शितल हगवणे (पिंपरी चिंचवड जिल्हा निरीक्षक), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला पदाधिकारी तसेच देवमाणूस फेम अभिनेत्री अस्मिता देशमुख (डिंपल) व विनोद पुलावळे (आमदार जनार्दन गायकवाड) आदी उपस्थित होते.

> **दोन वर्षे कोरोना काळात गेल्यामुळे कुठल्याही प्रकारच्या धार्मिक सणांमध्ये महिलांना सहभागी होता आले नाहीत. त्यामुळे जास्तीत-जास्त महिलांनी या स्पर्धेत सहभाग घ्यावा म्हणून विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. सदर स्पर्धेसाठी थेरगाव परिसरातील सुमारे पाचशे महिलांनी सहभागी होऊन उत्कृष्ट प्रतिसाद दिला.**
> **- माया बारणे, माजी नगरसेविका, पिंपरी-चिंचवड.**

विजेत्या महिलांमध्ये प्रथम क्रमांक स्वाती संजय शेळके यांनी मिळवला तसेच द्वितीय क्रमांक नंदा हनुमंत भिसे, तृतीय क्रमांक राजश्री मयूर गुंडगळ, चतुर्थ क्रमांक प्रिती संदेश भादेकर, पाचव्या क्रमांकाचे सौ. रुपाली प्रवीण तापकीर यांनी पटकावले. तसेच उत्तेजनार्थ शर्मिला अभिजित ओझरडे व अनिता राजु चव्हाण यांना मिळाले.

## संपादकीय »

# खरंच का टक्का गेला?

***मुंबईत अहोरात्र वेगळ्याच टक्केवारीची सोनेरी भाषा चालू असते. मात्र, निवडणुका आल्या की मराठी माणसाचा टक्का किती घसरला, याचे दळण सुरू होते. यात मराठी माणसाची मुंबईतील किंवा राष्ट्रीय पातळीवरील सततची पीछेहाट पाहून कुणाचे आतडे-बितडे तुटत नाही.***

मतांची बेगमी करण्यासाठी फेकलेले ते भाषिक अस्मितेचे दाणे असतात. गेली सहा दशके हे पोचट दाणे टिपत टिपत मुंबईतील मराठी माणूस एव्हाना महामुंबईच्या परीघावर परागंदा झाला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पैठण येथे बोलताना शिवसेनेवर कडाडून टीका केली. सध्या त्यांचे तेच व्रत आहे. ते म्हणाले की, मुंबईच्या निवडणुका आल्या की यांना मराठी माणूस आठवतो. यांनी विकास केला असता तर मराठी माणसाचा टक्का कमी झाला नसता. मुख्यमंत्र्यांचे हे विधान शंभर टक्के सत्य आहे. मुंबईतील मराठी माणसाची चिंता ना महापालिकेतील राज्यकर्त्यांनी केली; ना मंत्रालयात बसलेल्या सरकारांनी. संयुक्त महाराष्ट्र झाल्यापासून हेच चालू आहे आणि यात सुतराम बदल होण्याची शक्यता नाही. मुख्यमंत्री आज ही टीका करीत असले तरी 'मिसरूड फुटल्यापासून कालपर्यंत' तेही शिवसेनेतच होते की. तेव्हा त्यांनी मुंबईतील घसरत्या मराठी टक्क्याबद्दल काय केले, असा प्रश्न विचारता येईल. की तेव्हा त्यांचे लक्ष केवळ ठाण्यातच अडकले होते? प्रामाणिक आत्मपरीक्षण करायचे असेल तर मुंबईत मराठी माणसाची आज जी अवस्था झाली आहे, तिला आपण सगळेच जबाबदार आहोत, असे शिवसेनेसहित सर्व पक्षांना म्हणावे लागेल. इतके खरे हे पक्ष कशासाठी बोलतील?महाराष्ट्राने अभूतपूर्व आणि ऐतिहासिक लढा देऊन १९६० मध्ये मुंबई मिळवली. तेव्हा ४२ लाखांच्या मुंबईत २२ लाख मराठी होते. ही टक्केवारी निम्म्यापेक्षा जास्त होती. सन २०२० मध्ये मुंबईची लोकसंख्या एक कोटी ४२ लाख होती. यातील मराठी टक्का २७ म्हणजे ७० लाख होता, असा अंदाज आहे. करोनामुळे न झालेली २०२१ ची खानेसुमारी पुरी होईल आणि तिची आकडेवारी येईल, तेव्हा नवे धक्के बसण्याची शक्यता आहे. मुंबईत होणाऱ्या स्थलांतराचे अनेक अभ्यास झाले आहेत. आजही होत आहेत. रायगड, ठाणे, पालघर जिल्ह्यांसहित महामुंबई परिक्षेत्राचा विचार केला तर आजही उर्वरित महाराष्ट्रातून येणाऱ्या स्थलांतरितांची संख्या इतर राज्यांतून येणाऱ्यांपेक्षा जास्त आहे. मात्र, मुंबई महापालिकेच्या हद्दीचा विचार केला तर निव्वळ मराठी टक्का सातत्याने घसरतो आहे आणि हिंदी टक्का वाढतो आहे. उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, उडिशा यांच्यासहित सर्व देशातून नागरिक मुंबईत येऊन स्थिरावत आहेत. शिवसेनेच्या मराठीच्या अस्मितेला हिंदुत्वाची जोड ही एका अर्थाने मराठी अधिक बिगरमराठी यांची बेरीज होती. मुंबईत व महाराष्ट्रात सत्ता येण्यासाठी आता केवळ मराठीचा जरीपटका पुरा पडणार नाही, याची ती 'भगवी कबुली' होती.

# वेदांता प्रकरणात कुठल्या महाराष्ट्रद्रोह्याने शेण खाल्ले?



**भूमिका**

विक्रांत पाटील
8007006862



महाराष्ट्राच्या उद्धव ठाकरे सरकारने फॉक्सकॉन व वेदांताच्या सेमीकंडक्टर व डिस्प्ले प्रोजेक्टसाठी पुणे जिल्ह्यातील तळेगाव परिसरातील MIDC च्या ताब्यातील 400 एकर जागा मोफत व 700 एकर विकत अशी जमिनी संदर्भात 2,100 कोटी सबसिडी मंजूर केलेली होती. त्यानंतर प्रोजेक्टच्या वेगवेगळ्या सेक्टरमध्ये कॅपिटल सबसिडी तब्बल 39,000 कोटी रकमेच्या या कंपनीला महाराष्ट्राच्या दीर्घकालीन हितासाठी बहाल केल्या जाणार होत्या. आता गुजरातने फक्त 28,000 कोटीची कॅपिटल सबसिडी देऊन हा महाविकास आघाडी सरकारने महाराष्ट्रात आणलेला प्रकल्प पळवून नेला आहे. कंपनीवर दबाव असणार, हे तर नक्कीच; पण कुठल्या महाराष्ट्रद्रोह्याने शेण खाल्ले? शिंदे-फडणवीस सरकार बाप्पाला आरत्या ओवाळण्यात आणि दहीहंडी फोडण्याच्या नादात MVA सरकारने महाराष्ट्रात आणलेला इतका प्रोजेक्ट मोदी-शहांच्या गुजरातला आंदण करून बसले. याच मोदी-शहांच्या मर्जीने, मेहेरबानीने शिवसेनेतून फुटून निघालेल्या शिंदेंनी CM पदाची खुर्ची बळकावली आहे.

11 हजार कोटी रुपयाची कमी सबसिडी मिळूनही या प्रकल्पात 60% भागीदारी असलेले वेदांताचे मालक अनिल अग्रवाल यांनी हा प्रोजेक्ट महाराष्ट्रातून गुजरातमध्ये घेऊन जाण्याचे का मान्य केले असावे, याचे उत्तर शोधायला फार वेळ लागणार नाही. महाराष्ट्रातील ED सरकार राज्याच्या हिताचा विचार करण्यात कुचकामी ठरले आणि हीच ED ची मेहेरबानी गुजरातच्या पथ्यावर पडली. अर्थात, हे वेदांता कंपनीचे झाले; पण महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकार का झुकले? MVA सरकारने फायनल करून राज्यात आणलेला प्रोजेक्ट पूर्णत्वास नेण्यात ही जोडगोळी कुठे, का कमी पडली? त्यांनी राज्याच्या हिताची इच्छाशक्ती का दाखविली नाही? महाराष्ट्रात मोदी-शहा यांच्या मेहेरबानीने सत्तेत आलेले ED सरकार आता गुजरातपुढे असेच झुकत राहणार का? मग महाराष्ट्र धर्माचे काय? महाराष्ट्रहिताचे काय?

फडणवीस यांच्याकडून तर ते अपेक्षित नाहीच; पण बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांचे खरे शिष्य, वारसदार असलेले आणि स्वतःला ओरिजीनल शिवसैनिक म्हणवून घेणाऱ्या एकनाथ शिंदेंचे काय? हा बाळासाहेबांचा असली शिवसैनिक नव्हेच; हे तर मोदी-शहा यांच्या प्रती निष्ठा समर्पयामि केलेले नकली दिसताहेत. अशा लोकांच्या काळात महाराष्ट्र धर्म कसा वाढणार? महाराष्ट्र गुजरातच्या दावणीला बांधला; आता मुंबईही मोदी-शहा चरणी गहाण टाकणार का शिंदे सरकार? शिंदे यांची खुर्चीची हौस तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीत हुतात्मा झालेल्या 108 मराठीजनांच्या बलिदानाला कलंकित करू पाहत आहे. शिंदे सरकार, महाराष्ट्र धर्माला जागा. दिसू द्या तुमच्यातील ओरिजीनल बाळासाहेबांचा शिवसैनिक.

शिंदेंसोबत फुटून निघालेले इतर गुवाहाटीत ओक्के होऊन नाचणारे पराक्रमी वीरांनो - तुम्हाला पटतेय का हे शिंदे सरकारांचे वागणे? महाराष्ट्राच्या हिताच्या तुमच्या बाता आणि फुटीच्या समर्थनाच्या पोकळ वल्गना एव्हढ्यात हवेत विरल्या का? तुमचा नेता महाराष्ट्रहित गुजरातच्या दावणीला बांधत असताना उठतील का तुमच्या दाढा? की तोंडाला मुंगसे बांधून मौनी बाबा बनून राहणार? हे असेच सुरू राहिले तर भकास महाराष्ट्रातील जनता तुमच्या स्वतःच्या विकासाचे खोक्के काढल्याशिवाय राहणार नाही.

VIKRANT@JOURNALIST.COM

# जुनी पेन्शन योजनाच हवी

**देशातील एकेक राज्य पुन्हा जुन्या पेन्शन योजनेकडे वळत आहे. अशावेळी, महाराष्ट्रानेही सरकारी तसेच निमसरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना पुन्हा आणणे, सर्वांच्या हिताचे आहे. तसे झाले नाही तर मात्र दोन लाख कर्मचारी आंदोलनात उतरतील, असे दिसते...**

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची घोषणा केली आहे. एक सप्टेंबर, २२ पासून राज्यातील सुमारे एक लाख पंचवीस हजार कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होणार आहे. राजस्थान, छत्तीसगड नंतर जुनी पेन्शन योजना लागू करणारे झारखंड हे देशातील तिसरे राज्य ठरले आहे. अंशदायी निवृत्ती योजना बंद करून सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू केल्याने सर्व सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

महाराष्ट्रात नव्याने सत्तेवर आलेले एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार महाराष्ट्रातील सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लावणार का, हा खरा प्रश्न आहे. झारखंड सरकार राज्यातील सव्वा लाख कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना



लागू करत असेल तर महाराष्ट्रासारख्या प्रगतीशील राज्याला दोन लाख कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे अवघड नाही. इच्छाशक्ती असेल तर जुनी पेन्शन योजना लागू करणे शक्य आहे. महाराष्ट्र शासनाने तर एक नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या सुमारे २६ हजार कर्मचाऱ्यांनाही जुन्या पेन्शन पासून वंचित ठेवले आहे.

एक नोव्हेंबर २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांचे डीसीपीएस किंवा एनपीएस कपातीचा कोणताही हिशोब शासन देऊ शकलेले नाही. कर्मचारी हिस्सा आणि शासन हिस्सा यांच्या एकत्रित रकमेवर देय व्याज किती? जमा रक्कम किती? यांचा हिशोब कर्मचाऱ्यांना मिळालेला नाही. डीसीपीएस योजना बंद करून एनपीएस खाते उघडण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. परंतु डीसीपीएस अंतर्गत जमा रक्कम एनपीएसमध्ये आजतागायत वर्ग झालेली नाही. डीसीपीएस अंतर्गत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना मिळणारी पेन्शन तुटपुंजी म्हणजे किमान वेतनापेक्षा कमी असल्याचे आहे. तसेच, डीसीपीएस अंतर्गत कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या थकबाकीचा हप्ता मिळालेला नाही. सेवेची दहा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी मृत झालेल्या कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे ग्रॅज्युएटी व कुटुंब निवृत्ती वेतन योजना लागू न करता महाराष्ट्र शासनाने दहा लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा केली.

## ।। अभंगवाणी ।।



धर्माची तूं मूर्ती ।
पाप पुण्य तुझे हातीं ॥१॥
मज सोडवीं दातारा ।
कर्मापासूनि दुस्तरा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## सांगलीत 4 साधूंना बेदम मारहाण!



। सांगली । महाईन्यूज ।

दोन वर्षांपूर्वी पालघरमध्ये घडलेल्या साधूंच्या हत्याकांडाने संपूर्ण देशभर खळबळ उडाली होती. या घटनेचे पडसाद अजूनही उमटत आहेत. अशातच आता सांगली जिल्ह्यातही चार साधूंना मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मुलं चोरणारी टोळी समजून या साधूंना बेदम मारहाण करण्यात आली. जत तालुक्यातील लवंगा येथे ही घटना घडली आहे. या मारहाणीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. उत्तरप्रदेशमधील मथुरा येथील चौघे साधू हे कर्नाटकला देवदर्शनासाठी आले होते. त्यानंतर ते विजापूरवरुन जत तालुक्यातल्या लवंगामार्गे पंढरपूरला देवदर्शनासाठी निघाले होते. प्रवासादरम्यान चारही साधूंनी रात्रीच्या सुमारास लवंगा गावातील एका मंदिरामध्ये मुक्काम केला होता. त्यानंतर सकाळी हे चौघेही साधू गाडीतून पंढरपूर मार्गे निघाले. मात्र, तत्पूर्वी त्यांनी गावातील एका मुलाला रस्ता विचारला. मात्र, त्या तरुणाला हे साधू मुलं चोरणारी टोळी असल्याचा संशय आला आणि त्याने ही माहिती गावकऱ्यांना दिली. याच संशयावरुन ग्रामस्थांनी या साधूंकडे चौकशी करायला सुरुवात केली.

# रायगडमध्ये होणारा "बल्क ड्रग पार्क" प्रकल्पही महाराष्ट्राबाहेर!

## आदित्य ठाकरेंचा शिंदे-फडणवीस सरकारवर नवा आरोप

। मुंबई । महाईन्यूज ।

वेदांत समूह आणि फॉक्सकॉन यांच्या भागीदारीतून उभा राहणारा प्रकल्प गुजरातला गेल्याचं समोर आलं होते. त्यानंतर आता शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनी आणखी एक आरोप शिंदे-फडणवीस सरकारवर केला आहे. रायगडमध्ये होणारा बल्क ड्रग पार्कचा प्रकल्पही राज्याबाहेर गेला आहे, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे.

"रायगडमध्ये बल्क ड्रग पार्क प्रकल्प येणार होता. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केंद्र सरकारला पत्र लिहलं होते. सुभाष देसाई यांनी त्याबाबतचा प्रस्ताव कॅबिनेटमध्ये आणला होता.



मात्र, केंद्र सरकाराने गुजरात, आंध्रप्रदेश आणि हिमाचलला बल्क ड्रग पार्कबाबात विचारणा केली आहे. त्यात आता गुजरातमधील भरूचमध्ये हा बल्क ड्रग पार्क सुरु होणार आहे," अशी माहिती आदित्य ठाकरेंनी दिली आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

### मुख्यमंत्र्यांनी उद्योगमंत्र्यांचा राजीनामा घेतला असता"

**"महाराष्ट्राची शरमेनं मान खाली घालण्याचा प्रकार सूरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वेदांताचा एकेरी उल्लेख करत विधानसभेत सांगितलं की, चार लाख कोटींचा प्रस्ताव ते घेऊन आले. २ लाख कोटींच्या प्रकल्पाला चार लाख कोटी सांगणं, हे कोणत्या सरकारला शोभणारं आहे. २ लाख कोटी आणि १ लाख रोजगार उपलब्ध करून देणार प्रकल्प गेल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी उद्योगमंत्र्यांचा राजीनामा घेतला असता," असेही आदित्य ठाकरेंनी म्हटलं.**

**रायगडमध्ये होणारा बल्क ड्रग पार्कचा प्रकल्पही राज्याबाहेर गेला आहे, असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे. "रायगडमध्ये बल्क ड्रग पार्क प्रकल्प येणार होता. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केंद्र सरकारला पत्र लिहलं होते. सुभाष देसाई यांनी त्याबाबतचा प्रस्ताव कॅबिनेटमध्ये आणला होता. मात्र, केंद्र सरकाराने गुजरात, आंध्रप्रदेश आणि हिमाचलला बल्क ड्रग पार्कबाबात विचारणा केली आहे. त्यात आता गुजरातमधील भरूचमध्ये हा बल्क ड्रग पार्क सुरु होणार आहे,"**

# दसरा मेळाव्यावरून रामदास कदमांची उद्धव ठाकरेंवर टीका!

## शिंदे गटाचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच होईल : रामदास कदम

। सांगली। महाईन्यूज ।

दसरा मेळावा शिवाजी पार्कवर घेण्यावरून सध्या एकनाथ शिंदे गट आणि उद्धव ठाकरे यांच्यात संघर्ष बघायला मिळतो आहे. शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्याबाबत सर्वप्रथम शिवसेनेने अर्ज केला. त्यानंतर शिंदे गटातर्फे आमदार सदा सरवणकर यांनी महापालिकेकडे अर्ज केला. सध्या महापालिकेकडे दोन्ही अर्ज प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी शिंदे गटाची बैठक वांद्रे येथे झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दसरा मेळाव्याच्या तयारीसह इतर विषयांबाबत चर्चा केली. दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्क मैदान आपल्यालाच मिळेल, असा विश्वास शिंदे यांनी बैठकीत व्यक्त केला. दरम्यान, आता या वादात शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी उडी घेतली आहे. आमचा दसरा मेळावा शिवाजी पार्कवरच होईल, असा



**"आमची शिवसेना बाळासाहेबांच्या विचारावर चालते आहे. आमचा दसरा मेळावा, शिवतीर्थावर झाला पाहिजे, असं माझं ठाम मत आहे. गेले अनेक वर्ष एक नेता, एक आवाज, एक झेंडा, एक विचार, हे सर्व देशाने पाहिलेलं आहे. संपूर्ण देशाला बाळासाहेब एक विचार देत होते. मात्र,आता उद्धव ठाकरे जे विचार देतील ते सोनिया गांधींचे विचार असतील, त्यामुळे शिवसेना प्रमुखांचे विचार शिवतीर्थावरून देशभरात पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मेळावा झाला पाहिजे", असे ते म्हणाले.**

विश्वास त्यांनी टीव्ही ९ या वृत्तवाहिनीशी बोलताना व्यक्त केला आहे. तसेच यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंवरही टीका केली आहे.

काय म्हणाले रामदास कदम?

"आमची शिवसेना बाळासाहेबांच्या विचारावर चालते आहे. आमचा दसरा मेळावा, शिवतीर्थावर झाला पाहिजे, असं माझं ठाम मत आहे. गेले अनेक वर्ष एक नेता, एक आवाज, एक झेंडा, एक विचार, हे सर्व देशाने पाहिलेलं आहे. संपूर्ण देशाला बाळासाहेब एक विचार देत होते. मात्र,आता उद्धव ठाकरे जे विचार देतील ते सोनिया गांधींचे विचार असतील, त्यामुळे शिवसेना प्रमुखांचे विचार शिवतीर्थावरून देशभरात पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मेळावा झाला पाहिजे", असे ते म्हणाले.

"ठाकरे गटाला रोखण्यापेक्षा महाराष्ट्राचा विकास डोळ्यासमोर ठेऊन काम करायला हवं, ते त्यांचे काम करतील. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली आहे की, आपण ठाकरे गटाकडे लक्ष न देता, महाराष्ट्राच्या विकासाकडे लक्ष द्यायला हवं. शिवसेना प्रमुख्य बाळासाहेब ठाकरे यांना अभिप्रेत असलेलं काम आपल्याकडून कसं होईल, याकडे आपण लक्ष दिलं पाहिजे", असेही ते म्हणाले.

## "नूसतं बावनकुळे आडनाव असून चालत नाही, तर डोक्यात पण काहीतरी असावं लागतं"




। अमरावती। महाईन्यूज ।

"आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचा एकही नेता नसेल. पक्षातील सगळे नेते शिंदे गटात येतील", असं वक्तव्य भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही दिवसांपूर्वी केलं होतं. या वक्तव्यानंतर शिवसेना नेत्या किशोरी पेडणेकरांनी बावनकुळेंवर जोरदार टीका केली. "नुसतं बावनकुळे आडनाव असून चालत नाही, तर डोक्यात पण काहीतरी असावं लागतं. असा खोचक टोला पेडणेकरांनी लगावला होता". या टोल्याला आता बावनकुळेंनी प्रत्युत्तर दिलं आहे. "आगामी निवडणुकीत शिवसेनेचा एकही नेता नसेल. पक्षातील सगळे नेते शिंदे गटात येतील", असं वक्तव्य काही दिवसांपूर्वी चंद्रशेखर बावन्नकुळे यांनी केलं होतं. त्यांना उत्तर देताना किशोरी पेडणेकरांनी जोरदार टीका केली. "नुसतं बावनकुळे आडनाव असून चालत नाही, तर डोक्यात पण काहीतरी असावं लागतं". असा खोचक टोला पेडणेकरांनी लगावला होता. "गेल्या काही दिवसांपासून शिंदेगटातील नेत्यांकडून हिंसक वक्तव्य करण्यात येत आहेत. कुणी तंगडं तोडेल, कुणी हात-पाय तोडेल अशा धमक्या देत आहेत, त्यामुळे या सर्वांची तक्रार पोलिसांकडे करणार" असल्याचं किशोरी पेडणेकर यांनी म्हटलं होतं. शिवसेनेचं शिष्टमंडळ घेऊन पोलीस स्टेशनमध्ये जाणार असल्याचंही त्या म्हणाल्या होत्या.

## शॉर्ट न्यूज »

### दुबईत उभारलं जाणार 'मून रिसॉर्ट'



।नवी दिल्ली।

तशी दुबईची वेगळी ओळख सांगण्याची गरज नाही. अगदी या जागेला भेट न देणाऱ्यांनाही दुबईची महती आहे. जगातील सर्वात उंच इमारत असणारी बुर्ज खलिफा याच शहरात आहे. त्याप्रमाणे बुर्ज अल अरब सारखे आगळेवेगळे संग्रहालयही पर्यटकांच्या आवडत्या ठिकाणांपैकी एक आहे. आता समोर आलेल्या एका वृत्तानुसार दुबईमध्ये आता एक आलिशान रिसॉर्ट उभारण्यात येणार असून हे रिसॉर्ट चंद्राच्या थीमवर आधारीत असणार आहे. या रिसॉर्टचे काही कनसेप्ट बेस फोटो सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहेत. दुबईमधील हे चंद्रसारखं दिसणारं रिसॉर्ट उभारण्यासाठी जवळजवळ ५ बिलियन अमेरिकी डॉलर्स खर्च केले जाणार आहेत.

# 1 लाख 66 हजार कोटींची गुंतवणूक गुजरातला गेल्याने महाराष्ट्रात वाद!

## महाराष्ट्राऐवजी गुजरातला हा प्रकल्प जाणे हे शिंदे-फडणवीस सरकारचे अपयश

।नवी दिल्ली
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

'वेदांत समूह' आणि 'फॉक्सकॉन' यांच्या भागीदारीतून तीन टप्प्यांत महाराष्ट्रात येऊ घातलेली १ लाख ६६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आता गुजरातकडे वळवल्याच्या मुद्द्यावरुन राज्यामध्ये राजकरण चांगलेच तापले आहे. या गुंतवणुकीसाठी गुजरातची निवड केल्याचे वेदांत समूहाने जाहीर केले असून, या प्रकल्पामुळे उभे राहणारे पूरक छोटे उद्योग, लाखोंचा रोजगार, शेकडो कोटींच्या कर महसुलास महाराष्ट्राला मुकावे लागणार आहे. हे शिंदे-फडणवीस सरकारचे अपयश असल्याची टीका विरोधकांनी केली. तर शिंदे सरकारने यासाठी महाविकास आघाडी दोषी असल्याचं विधान केलं आहे. असं असतानाच पंतप्रधान नरेंद्र




मोदींनी या करारासंदर्भात ट्विटरवरुन प्रतिक्रिया दिली आहे.

### घडलं काय?

महाविकास आघाडी सरकारच्या काळात वेदांत समूहाने प्रकल्पाबाबत महाराष्ट्राशी चर्चा सुरू केली होती. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर जुलैच्या शेवटच्या आठवड्यात 'वेदांत ग्रुप' आणि 'फॉक्सकॉन' कंपनीच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वेदांतने तैवानच्या फॉक्सकॉन कंपनीशी भागीदारी केली असून, या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये तीन टप्प्यांमध्ये प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित होते. यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले डिस्प्ले फॅब्रिकेशन, ६३ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे सेमीकंडक्टर्स तसेच ३८०० कोटी रुपयांचा चाचणी प्रकल्प यांचा समावेश आहे. याबाबत 'एमआयडीसी'शी प्राथमिक चर्चा सुरू होती. पश्चिम महाराष्ट्रात तळेगाव तर विदर्भात बुटीबोरीच्या जागेचा पर्याय देण्यात आला. या प्रकल्पांमधून सुमारे २ लाख जणांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळेल, असे बैठकीतील सादरीकरणावेळी सांगण्यात आले होते. हा उद्योग महाराष्ट्रात यावा यासाठी केंद्र शासनातर्फे लागणारे सहकार्यही घेण्यात येणार आहे, असे सांगत सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली होती. मात्र, मंगळवारी वेदांत समूहाने आपला प्रकल्प गुजरातमध्ये उभारण्यात येणार असल्याचे जाहीर केले आणि महाराष्ट्राकडे येऊ घातलेला आणखी एक प्रकल्प गुजरातकडे गेल्याचे स्पष्ट झाले. या प्रकल्पासाठी गुजरात सरकारने १ हजार एकर जमीन विनाशुल्क देऊ केली आहे. तसेच वीज व पाणी सवलतीच्या दरात आणि तेही २० वर्षांसाठी एकाच दराने देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. फॉक्सकॉनची गुंतवणूक महाराष्ट्रात यावी, यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील होते. पण, गुजरातच्या महाशक्तीपुढे त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले. यापूर्वीही २०१४ ते २०१९ या काळात मुख्यमंत्री असताना फॉक्सकॉनची ॲपल कंपनीशी निगडीत गुंतवणूक महाराष्ट्रात यावी, यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी प्रयत्न केले होते. पण, त्यावेळी त्यांना यश आले नव्हते. याबाबत फडणवीस यांच्याशी संपर्क साधला असता, संपर्क होऊ शकला नाही.

### मोदी काय म्हणाले?

"हा सामंजस्य करार भारतामध्ये सेमीकंडक्टर्स निर्मितीला वेग देण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. ही एक कोटी ५४ लाखांची गुंतवणूक अर्थव्यवस्थेला आणि रोजगाराला चालना मिळण्यासाठी फार उपयुक्त ठरणार आहे. यामुळे सहाय्यक उद्योगांसाठी एक प्रचंड परिसंस्था तयार होईल. याचा फायदा मध्यम आणि लघू उद्योगांना होईल," असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

## अहमदाबादमध्ये मोठी दुर्घटना

# बांधकामाचे सामान घेऊन जाताना अचानक सातव्या मजल्यावर लिफ्ट तुटली, सात मजुरांचा जागीच मृत्यू!

## इमारतीच्या नवव्या मजल्याचे बांधकाम सुरु होते. त्यासाठी हे मजूर लिफ्टने सामान वर नेत होते.

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अहमदाबादमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. बांधकाम सुरू असलेल्या इमारतीची लिफ्ट कोसळून सात मजूरांचा मृत्यू झाला आहे. तर एक मजूर गंभीर जखमी झाली आहे. गुजरात विद्यापीठाजवळ एस्पायर-२ (Aspire-2 ) नावाच्या इमारतीचं बांधकाम सुरू असताना ही घटना घडली. जखमींना अहमदाबादच्या सिव्हिल रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. अग्निशमन दलाच्या गाड्याही घटनास्थळी पोहोचल्या असून मदतकार्य सुरू करण्यात आलं आहे. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी इमारतीच्या नवव्या मजल्यावर बांधकाम सुरू होते. यावेळी कामगार लिफ्टमधून सामान वरच्या मजल्यावर नेते होते. मात्र लिफ्ट सातव्या मजल्यावर पोहोचताच अचानक तुटली, आणि खाली कोसळली, यावेळी लिफ्टमध्ये एकूण ८ मजूर होते. यातील सात मजुरांचा मृत्यू झाला आहे. तर एक मजूर जखमी झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ , धाव घेत कामगारांना लिफ्टमधून बाहेर काढले.

### अधिक वजनामुळे लिफ्ट कोसळल्याचा संशय

**सर्व कामगार एकत्र लिफ्टमध्ये उभे होते. अधिक वजनामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. लिफ्ट तुटताच आठही मजूर एकत्र खाली पडले. या कामगारांच्या सुरक्षेसाठी जाळीही बसवण्यात आली होती, मात्र ती कमकुवत निघाली. जाळीसह कामगार खाली पडले. यातील काही मजूर ग्राउंड फ्लोअरवर, तर काही मजूर बेसमेंटमध्ये पडले. त्यापैकी ७ जणांचा मृत्यू झाला.**



# 16 सप्टेंबरपासून प्राइम व्हिडिओवर स्ट्रीम होणार 'दगडी चाळ 2'

प्राइम व्हिडिओतर्फे आज लोकप्रिय मराठी फिल्म 'दगडी चाळ 2' च्या डिजिटल प्रीमियरची घोषणा करण्यात आली, या फिल्मचा डिजिटल प्रीमियर 16 सप्टेंबर रोजी होणार आहे. 2015 साली याच नावाने प्रदर्शित झालेल्या ब्लॉकबस्टर फिल्मचे हे सिक्वल असून, या ॲक्शन थ्रिलरमध्ये मुंबईतील दगडी चाळीत राहणाऱ्या लोकांच्या आयुष्याचे वास्तव चित्रित करण्यात आले आहे. चंद्रकांत कणसे यांनी दिग्दर्शित केलेल्या या फिल्मची निर्मिती संगीता अहिर व मंगलमूर्ती फिल्म्स, यांनी केली आहे. थिएटरमधील रिलीजनंतर प्रेक्षक व समीक्षकांनी या फिल्मची प्रशंसा केली होती. भारत आणि अन्य 240 देश-प्रदेशांतील प्राइम सदस्य हा ब्लॉकबस्टर ॲक्शन थ्रिलर स्ट्रीम करू शकतील.

मुंबईत पडद्याआड चालणाऱ्या गुन्ह्यांच्या कथा सांगणारे हे सिक्वेल पुन्हा एकदा कुप्रसिद्ध दगडी चाळीतच घडते. ज्येष्ठ अभिनेते मकरंद देशपांडे व अंकुश चौधरी पुन्हा एकदा अनुक्रमे डॅडी व सूर्याच्या भूमिकांमध्ये आहेत. चाळ पाडल्यानंतर आपली आयुष्ये नव्याने बांधण्याच्या प्रक्रियेतून ते जात आहेत. डॅडीच्या राजकीय महत्त्वाकांक्षा त्याला पुढे घेऊन जातात, तर सूर्याचा सोनलसोबत (पूजा सावंत) रोमॅण्टिक प्रवास सुरू राहतो. रहस्यात गुंफलेल्या कथेतून थरारक पद्धतीने गुन्हे, हिंसा व समाजातील सत्तासंघर्ष उलगडत जातो.




# 'मन कस्तुरी रे' चित्रपटातील तेजस्वीचा फर्स्ट लूक रिलीज

टीव्ही अभिनेत्री तेजस्वी प्रकाश काही ना काही कारणाने सातत्याने चर्चेत असते. मग त्या चर्चा तिच्या कामाबद्दल असो किंवा वैयक्तिक आयुष्याबद्दल. ती नेहमीच नेटकऱ्यांचं लक्ष तिच्याकडे वेधून घेत असते. तेजस्वी तिच्या अप्रतिम सौंदर्यासाठी आणि अभिनयासाठी प्रसिद्ध आहे. छोट्या पडद्यावरुन आपल्या भेटीला येणारी तेजस्वी लवकरच मराठी रुपेरी पडदयावर आपला जलवा दाखवणार आहे.
नुकताच आगामी 'मन कस्तुरी रे' या चित्रपटातील तेजस्वीचा 'फर्स्ट लूक' रिलीज झाला आहे. यातून तिचा बबली आणि रॉकिंग अंदाज प्रेक्षकांसमोर आला आहे. 'श्रुती' असं तिच्या चित्रपटातील भूमिकेचं नाव आहे. नितीन केणी यांच्या 'मुंबई मुव्ही स्टुडिओ'ची प्रस्तुती असलेला हा चित्रपट ४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.
या व्हिडीओमधील तिचा चुलबुला आणि रॉकिंग अंदाज प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. या चित्रपटात तेजस्वी सोबत अभिनेता अभिनय बेर्डे झळकणार आहे. या दोघांची 'लव्हेबल केमिस्ट्री' आपल्या चाहत्यांची मने जिंकायला सज्ज झाली आहे. चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन संकेत माने यांचे आहे.



**बहुभाषिक आशय देणारा ओटीटी प्लॅटफॉर्म सज्ज झाला असून 16 सप्टेंबर रोजी त्यावर 'टाइमपास 3' पाहायला मिळणार आहे. फ्रँचाईझीमधले पहिले दोन्ही सिनेमे या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.**

# 'टाइमपास 3' आता पाहता येणार ओटीटीवर

मराठी फ्रँचाईझी 'टाइमपास' प्रेक्षकांमध्ये तुफान लोकप्रिय ठरली असून या फ्रँचाईझीचं वर्णन आता 'इमोशन' म्हणून केलं जातंय. या फ्रँचाईझीचा वारसा पुढे नेण्यासाठी ZEE5- हा भारतातील सर्वात मोठा एत्तद्देशीय आणि बहुभाषिक आशय देणारा ओटीटी प्लॅटफॉर्म सज्ज झाला असून 16 सप्टेंबर रोजी त्यावर 'टाइमपास 3' पाहायला मिळणार आहे. फ्रँचाईझीमधले पहिले दोन्ही सिनेमे या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.
या यशस्वी फ्रँचाईझीच्या तिसऱ्या भागाचे दिग्दर्शन रवी जाधव यांनी केले असून त्यात प्रथमेश परब व हृता दुर्गुळे प्रमुख भूमिकेत आहेत. 36 टक्के मिळवून बारावीची परीक्षा पास झाल्यानंतर दगडू कॉलेजमध्ये पाऊल टाकतो आणि मग पुढे काय होतं हे या या सिनेमात पाहायला मिळेल. गुंड म्हणून आपला भूतकाळ मागे टाकून नवी सुरुवात करण्याचा दगडूचा निश्चय त्याच्या भोवती असलेल्या लोकांमुळे पणाला लागतो. आपण कधीच बदलणार नाही असं त्याला वाटायला लागतं, मात्र तरीही पुढे जात राहाण्याचं बळ त्याला मिळतं, कारण तो एका गँगस्टरच्या मुलीच्या- पालवीच्या प्रेमात पडतो. दगडूच्या सुसंस्कृत वागण्यानं पालवी प्रभावित होते, मात्र सगळ्याच चांगल्या गोष्टी कधी ना कधी संपतात या न्यायाने दगडूचं हा उसना अवतारही संपतो. त्यामुळे दगडू- पालवीच्या नात्यावर काय परिणाम होतो हे या सिनेमात उलगडेल.



# पहिल्या प्रेमाची आठवण करून देणारा "प्रेम म्हणजे काय असतं?"

आपल्या आयुष्यातील प्रेमाची आठवण करून देणारा, नॉस्टॅल्जिक करणारा प्रेम म्हणजे काय असतं? या चित्रपटाचा टीजर लॉंच करण्यात आला आहे. प्रेमाची हळुवार भावना उलगडणारा हा चित्रपट ४ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.
सातारयाच्या तख्त प्रॉडक्शनने "प्रेम म्हणजे काय असतं" या चित्रपटाची पहिलीवहिली निर्मिती केली आहे. प्रसाद दत्तात्रय इंगवले यांनी चित्रपटाचं



लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती अशी तिहेरी जबाबदारी निभावली आहे. प्रेम ही संकल्पना अत्यंत वेगळ्या पद्धतीने या चित्रपटात मांडण्यात आली आहे. प्रेम या संकल्पनेवर आजवर अनेक चित्रपट झाले. मात्र याच संकल्पनेचा आणखी एक वेगळा पैलू "प्रेम म्हणजे काय असतं" या चित्रपटातून मांडला जाणार आहे. नवोदित कलाकारांना या चित्रपटातून संधी देण्यात आली आहे.
खळाळत वाहणाऱ्या धबधब्याजवळ प्रसन्नतेनं बसलेली लहान मुलगी आणि मोहरून जाणारा लहान मुलगा या टीजरमध्ये दिसतात. तसंच प्रेम म्हणजे काय हे

## शॉर्ट न्यूज »

### गांगुली, शहा यांचे भवितव्य अधांतरी!



नवी दिल्ली । महाईन्यूज

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) संपूर्ण स्वायत्त संस्था असूनही कामकाजाचे सूक्ष्म व्यवस्थापन ते करू शकत नाही, असे मत व्यक्त करत सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी 'बीसीसीआय'कडे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेमध्ये (आयसीसी) प्रतिनिधित्व करण्यासाठी ७० वर्षांपेक्षा अधिक वयाचे पदाधिकारी कशाला हवेत, अशी विचारणा केली. याचप्रमाणे विरामकाळाची अटही रद्द करण्यास विरोध असल्याचे सांगून बुधवारी सुनावणी चालू राहील, हे स्पष्ट केले.

'बीसीसीआय'ने पदाधिकाऱ्यांच्या विरामकाळाची अट रद्द करण्यासाठी न्यायालयात परवानगी मागितली होती. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड आणि हिमा कोहली यांच्या खंडपीठासमोर मंगळवारी सुनावणी सुरू झाली. 'बीसीसीआय'चा अध्यक्ष सौरव गांगुली आणि सचिव जय शहा यांचा त्यांच्या संबंधित राज्य संघटनेवरील कार्यकाळ घटनेनुसार संपला आहे.

# जागतिक कुस्ती स्पर्धा : विनेश पात्रता फेरीतच गारद!

### भारतीय मल्लांची निराशाजनक कामगिरी

।बेलग्रेड । महाईन्यूज ।

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सर्व १२ वजनी गटांत पदक मिळवणाऱ्या भारतीय कुस्तीगीरांच्या कामगिरीला जागतिक स्पर्धेत मात्र उतरती कळा लागली. ऑलिम्पिक पदकविजेती आणि राष्ट्रकुल विजेती विनेश फोगटला पात्रता फेरीतच पराभवाचा सामना करावा लागला. भारतीयांसाठी हे सर्वात मोठे अपयश ठरले.

स्पर्धेतील ५३ किलो वजनी गटात विनेश मंगोलियाच्या खुलन बटखुयागकडून पराभूत झाली. आक्रमक आणि वेगवान कुस्ती करत खुलनने विनेशला संधीच दिली नाही आणि गुणांवर ७-० अशी बाजी मारली. खुलनने पुढे उपांत्य फेरी गाठली असून, तिच्या विजयावर आता विनेशच्या आशा अवलंबून असतील. स्पर्धेपूर्वी पात्रता फेरीत विनेशने अंतिमचे आव्हान मोडून जागतिक स्पर्धेत स्थान मिळविले होते. एक महिन्यापूर्वी अंतिमने २३ वर्षांखालील आशियाई स्पर्धेत खुलनवर मात केली होती. स्पर्धेतील ५० किलो वजनी गटात नीलमचेही आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले. सुषमा शोकिनला ५५ किलो वजनी गटात संधी होती. मात्र, रेपिचेज गटात सुषमाला मालदीवच्या मरिना ड्रॅगुटनविरुद्ध आपली ८-६ आघाडी टिकवता आली नाही. लढतीच्या अखेरच्या टप्प्यात मरिनाने सुषमाला चितपट केले. शेफाली (६५ किलो) आणि प्रियांका (७६ किलो) यांनाही लढतीच्या सुरुवातीच्या फेरीतच पराभवाचा सामना करावा लागला. अर्थात, त्यांच्या प्रतिस्पर्धीनी उपांत्य फेरीपर्यंत मजल मारल्यामुळे दोघींना अजून संधीची आशा आहे.



**स्पर्धेतील ५३ किलो वजनी गटात विनेश मंगोलियाच्या खुलन बटखुयागकडून पराभूत झाली. आक्रमक आणि वेगवान कुस्ती करत खुलनने विनेशला संधीच दिली नाही आणि गुणांवर ७-० अशी बाजी मारली. खुलनने पुढे उपांत्य फेरी गाठली असून, तिच्या विजयावर आता विनेशच्या आशा अवलंबून असतील. स्पर्धेपूर्वी पात्रता फेरीत विनेशने अंतिमचे आव्हान मोडून जागतिक स्पर्धेत स्थान मिळविले होते. एक महिन्यापूर्वी अंतिमने २३ वर्षांखालील आशियाई स्पर्धेत खुलनवर मात केली होती. स्पर्धेतील ५० किलो वजनी गटात नीलमचेही आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले. सुषमा शोकिनला ५५ किलो वजनी गटात संधी होती. मात्र, रेपिचेज गटात सुषमाला मालदीवच्या मरिना ड्रॅगुटनविरुद्ध आपली ८-६ आघाडी टिकवता आली नाही.**

# बॅडिमटन क्रमवारीत प्रणॉय १६व्या स्थानी

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर भारताचा बॅडिमटनपटू एच.एस. प्रणॉयने जागतिक क्रमवारीत १६व्या स्थानी मजल मारली आहे. प्रणॉयच्या क्रमवारीत दोन क्रमांकांनी सुधारणा झाली आहे. किदम्बी श्रीकांतचेही स्थान दोन क्रमांकांनी सुधारले असून, तो आता १२व्या स्थानावर आला आहे. पहिल्या १० जणांमध्ये केवळ लक्ष्य सेनला स्थान मिळाले आहे. तो नवव्या स्थानावर आहे.

जागतिक अजिंक्यपद आणि जपान खुल्या स्पर्धेतून माघार घेतल्यानंतरही पी. व्ही. सिंधूने ताज्या क्रमवारीत सातवे स्थान टिकवले आहे. लंडन ऑलिम्पिक पदक विजेत्या सायना नेहवालने तीन स्थानांनी आगेकूच करीत ३०व्या स्थानापर्यंत मजल मारली आहे. दुहेरीत राष्ट्रकुल विजेतेपदानंतर चिराग शेट्टी-सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी यांचे आठवे स्थान कायम राहिले आहे. महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा-एन, सिक्की रेड्डी २८व्या स्थानावर आहेत. मिश्र दुहेरीत तनिशा क्रॅस्टो-इशान भटनागर ३३व्या स्थानावर असून, कारकीर्दीतील ही त्यांची सर्वोत्तम क्रमवारीतील कामगिरी आहे.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही